महाराष्ट्र शासन
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२

दूरध्वनी क्र २२८५०५९५-०२२ Email ID : amol.sakharkar@nic.in

क्रमांक: संकिर्ण-२०२२/ सं.क्र.१६/ नो.शा. दिनांक : ७ जून, २०२२

# Tender Notice

## संगणक, प्रिंटर्स व स्कॅनर, फॅक्स मशीन इ. विक्री करणेसाठी निविदा सुचना

कृषि व पदुम विभागातील निर्लेखित केलेले संगणक साहित्य निविदा पध्दतीने **"जेथे आहे तेथून व जशी आहे तशी"** या प्रमाणे विक्री करणे आहे. साहित्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | संगणक सामुग्रीचे विवरण | एकूण नग |
|---|---|---|
| १ | डेस्कटॉप वन संगणक-इन-ऑल/ (सीपीयु) | ८४ |
| २ | मॉनिटर | ५८ |
| ३ | मल्टीफंक्शन प्रिंटरमोनो प्रिंटर / | ९७ |
| ४ | स्कॅनर | ०२ |
| ५ | फॅक्स मशीन | ०३ |
| | **एकुण** | **२४४** |

२. निविदा अर्ज अवर सचिव, प्रशा-३ (रोखशाखा), कृषि व पदुम विभाग, दालन क्र. ५१३ (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई- ४०० ०३२ येथे दिनांक ७ जून, २०२२ ते दिनांक १३ जून, २०२२ या कालावधीत दुपारी ३.०० ते ५.३० या वेळेत विक्रीसाठी ठेवण्यात आलेले आहे. सदर निविदा अर्ज शुल्क रु.१००/- (रुपये शंभर फक्त) आहे.

३. उपरोक्त साहित्य/वस्तू कृषि व पदुम विभागाच्या, नोंदणी शाखा, खोली क्र. ५३०, ५ वा मजला (विस्तार), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ येथे दिनांक ७ जून, २०२२ ते दिनांक १३ जून, २०२२ या कालावधीत दुपारी ३.०० ते ५.०० या वेळेत (सुटीचे दिवस वगळून) पहावयास मिळेल.

४. याबाबतच्या अटी व शर्ती माहितीस्तव सोबत जोडल्या आहेत.

(अ.नि.साखरकर)
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

## कृषि व पदुम विभागातील निर्लेखित संगणक, प्रिंटर्स व स्कॅनर, फॅक्स मशीन इ. विक्रीची निविदा सुचना

### नियम, अटी व शर्ती.

१. कृषि व पदुम विभागातील निर्लेखित केलेले ऑल-इन-वन संगणक/सी.पी.यु./मॉनिटर/ मल्टीफंक्शान प्रिंटर/ स्कॅनर, फॅक्स मशीन इ. निविदा पध्दतीने **जेथे आहे व जसे आहे तसे या** तत्वावर विक्री करणे आहे. त्याचा तपशिल पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | संगणक सामुग्रीचे विवरण | एकूण नग |
|---|---|---|
| १ | डेस्कटॉप (सीपीयु) /ऑल-इन-वन संगणक | ८४ |
| २ | मॉनिटर | ५८ |
| ३ | मल्टीफंक्शान प्रिंटर/ मोनो प्रिंटर | ९७ |
| ४ | स्कॅनर | ०२ |
| ५ | फॅक्स मशीन | ०३ |
| | **एकुण** | **२४४** |

२. उपरोक्त साहित्य/वस्तू कृषि व पदुमविभाग, नोंदणी शाखा,खोली क्र. ५३०, ५ वा मजला (विस्तार), मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ यांचे मार्फत **दिनांक ७ जून, २०२२ ते दिनांक १३ जून, २०२२** या कालावधीत **दुपारी ३.०० ते ५.३० या वेळेत** (सुटीचे दिवस वगळून) पहाण्यासाठी उपलब्ध आहेत. निविदा नमुना अर्जाची किंमत रुपये १००/- आहे. ज्या इच्छुक खरेदीदारास सदर साहित्य/वस्तू खरेदी करावयाचे आहे. त्यांनी सदर साहित्य/वस्तूंची प्रत्यक्ष पाहणी करुन, अवर सचिव, प्रशा-३ (रोखशाखा), कृषि व पदुम विभाग, दालन क्र. ५१३ (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई- ४०० ०३२, यांच्याकडे रुपये १००/- (ना-परतावा) भरणा करुन त्यांचेकडून रकमेची पावती व निविदा नमुना अर्ज प्राप्त करावा.

३. इच्छुक खरेदीदाराने खरेदी करावयाचे साहित्य/वस्तूंचे दर (देकार) विहित निविदा नमुन्यामध्ये बंद लिफाफ्यात **दिनांक ७ जून, २०२२ ते दिनांक १३ जून, २०२२ या कालावधीत दुपारी ३.०० ते ५.३० या वेळेत** अवर सचिव (नोंदणी शाखा), कृषि व पदुम विभाग, दालन क्र.५३० (विस्तार),मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई- ४०० ०३२, या कार्यालयात समक्ष सादर करावेत. **निविदा अंतिमरित्या सादर करण्याचा दिनांक १३ जून, २०२२ दुपारी ५.३०** वाजेपर्यंत राहील. विहित वेळेनंतर सादर केलेल्या व विहित वेळेनंतर पोस्टाने पाठविलेल्या निविदा स्विकारल्या जाणार नाहीत. यास्तव, आपली निविदा वरील कार्यालयात अंतिम दिनांकापूर्वी व वेळेत पोहोचविण्याची जबाबदारी संबंधित निविदाधारकाची राहील. याबाबत कोणतीही तक्रार स्विकारण्यात येणार नाही.

४. सदर विक्री ही निविदा पध्दतीने करण्यात येणार असल्याने निविदेच्या बंद लिफाफ्यावर **"निर्लेखित संगणक सामुग्री खरेदीसाठी निविदा"** तसेच ई-मेल व दुरध्वनी/मोबाईल क्रमाक स्पष्ट नमूद करुन निविदा सादर करण्यात यावी. निविदाधारकाने निविदा अर्जासोबत अर्जाची रु.१००/- इतकी रक्कम विभागात जमा केल्याची पावती निविदेसोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा, निविदा ग्राह्य धरली जाणार नाही.

५. निविदाधारकाने निविदा सादर करताना पॅनकार्ड, आधारकार्ड, दुकान (असल्यास) नोंदणीचा पुरावा इ. पुरावा बंद लिफाफ्यात अर्जासोबत सादर करावा. तसेच, जुने संगणकीय निर्लेखित करण्यात आलेली उपकरणे खरेदी करण्यासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने वितरीत केलेला वैध ई-कचरा व्यवस्थापन परवाना प्रत स्वतंत्ररित्या (लिफाफ्यात बंद न करता) सादर करणे आवश्यक राहील.

(कृ.मा.प)

६. निविदा उघडण्याचा दिनांक व वेळ निविदाधारकांना ई-मेल/ दुरध्वनीद्वारे कळविण्यात येईल. निविदा उघडण्याच्या विहित दिनांक व वेळेस संबंधित निविदाधारकास किंवा त्याच्या प्रतिनिधीस व्यक्तीश: उपस्थित राहता येईल. संबंधित निविदाधारक अनुपस्थित राहील्यास सदर निविदा उपस्थित निविदाधारक/प्रतिनिधींसमोर उघडण्यात येईल. कोणताही निविदाधारक उपस्थित न राहील्यास त्यांच्या अनुपस्थितीत निविदा उघडण्यात येतील. याबाबत अनुपस्थित निविदाधारकांची कोणतीही तक्रार स्विकारण्यात येणार नाही.

**७. निर्लेखित साहित्य/वस्तूंची निविदेची रुपये १८,६००/- इतकी कमीत कमी विक्री किंमती निश्चित करण्यात आली आहे. त्यापेक्षा कमी किंमतीची निविदा बाद ठरविण्यात येईल. विभागाने निश्चित केलेल्या विक्रीच्या किंमतीपेक्षा सर्वात जास्त रकमेची निविदा सादर करणाऱ्या निविदाधारकास सदर निविदा प्रक्रीयेमध्ये "यशस्वी निविदाधारक" म्हणून घोषित करण्यात येईल.**

८. यशस्वी निविदाधारकाने निविदेत नमूद केलेल्या रकमेचा कार्यालयीन ५ (पाच) दिवसात (सुटीचे दिवस वगळून) **"अवर सचिव, प्रशा-३ (रोखशाखा/ नोंदणीशाखा), कृषि व पदुम विभाग, दालन क्र. ५१३ (विस्तार), मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मुंबई- ४०० ०३२,"** यांच्याकडे रोख किंवा डिमांड ड्राफ्ट स्वरुपात भरणा करणे आवश्यक राहील. अन्यथा, त्याची निविदा रद्दबातल ठरविली जाईल व उपरोक्त अ.क्र.७ मध्ये नमूद केलेल्या निवड प्रक्रीयेनुसार द्वितीय क्रमांकाच्या रकमेची निविदा सादर करणाऱ्या निविदाधारकास यशस्वी निविदाधारक म्हणून घोषित करण्यात येईल.

९. यशस्वी निविदाधारकाने निविदेची रक्कम भरणा केल्यानंतर **पाच दिवसात** सदर साहित्य/वस्तू आहे त्या ठिकाणावरुन स्वखर्चाने ताब्यात घेणे आवश्यक राहील. त्यासाठी कृषि व पदुमविभागामार्फत कोणतेही मनुष्यबळ किंवा इतर खर्च देण्यात येणार नाही. तसेच, निविदा मंजूरीनंतर सदर साहित्य/वस्तू वाहतूक करताना/ताब्यात घेताना आवश्यक असलेले शुल्क/कराचा भरणा किंवा अनुषंगिक खर्चाची जबाबदारी संबंधित निविदाधारकाची राहील.

१०. यशस्वी निविदाधारकाने रक्कम भरणा केल्यानंतर कोणत्याही कारणास्तव साहित्य/वस्तू घेण्यास नकार दिल्यास त्याने जमा केलेली रक्कम कोषागारात जमा करण्यात येईल व सदर रक्कम कोणत्याही परिस्थितीत संबंधित निविदाधारकास परत करण्यात येणार नाही.

११. निविदेबाबत निविदाधारकाची कोणतीही अट/शर्त स्विकारली जाणार नाही.

१२. कोणतेही कारण न देता निविदा प्रक्रीया कोणत्याही टप्प्यावर थांबविणे किंवा नाकारण्याचे पूर्ण अधिकार विभाग राखून ठेवत आहे.

१३. यशस्वी निविदाधारकाने साहित्य/वस्तू ताब्यात घेताना कार्यालयाच्या मालमत्तेचे नुकसान झाल्यास त्याचेकडून मालमत्तेच्या नुकसानीची भरपाई वसूल करण्यात येईल.

****************************